**राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरीकांच्या लिव्हिंग विल्स (Advance Medical Directives) कायमस्वरुपी जतन करण्यासाठी संरक्षकाची (Custodian) नेमणूक करणे तसेच एक समान डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : आरोग्य-२०२४/प्र.क्र. ९३/नवि-२०**
४ था मजला, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०७ एप्रिल, २०२६

**वाचा :**

१) मा.सर्वोच्च न्यायालय, येथे दाखल रिट याचिका क्र.२१५/२००५ मधील संकिर्ण आवेदन (Misc. Application) क्र.१६९९/२०१९ मध्ये प्राप्त मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश.

२) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.३/२०२४ मध्ये प्राप्त मा.उच्च न्यायालयाचे निर्देश.

**प्रस्तावना :**

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२१५/२००५ मधील संकीर्ण आवेदन (Misc. Application) क्र.१६९९/२०१९ मध्ये नागरिकांच्या लिव्हिंग विल (Advance Medical Directives) कायमस्वरुपी जतन करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

"A copy shall be handed over to the competent officer of the local Government or the Municipal Corporation or Municipality or Panchayat, as the case may be. The foresaid authorities shall nominate a competent official in that regard who shall be the custodian of the said document."

**०२.** मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त निर्देशांचे अनुषंगाने कार्यवाही करण्यास्तव मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरुध्द जनहित याचिका क्र.०३/२०२४ दाखल करण्यात आली होती. सदर जनहित याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाचे निर्देश दिले आहेत.

**०३.** मा.सर्वोच्च न्यायालयाने नागरिकांच्या लिव्हिंग विल (Advance Medical Directives) कायमस्वरुपी जतन करण्याकरिता संरक्षकाची (Custodian) नेमणूक करणे संदर्भात दिलेल्या निर्देशाचे अनुषंगाने शहरी भागातील नागरिकांकरिता नागरिकांच्या लिव्हिंग विल (Advance Medical Directives) कायमस्वरुपी जतन करण्यासाठी राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती येथे संरक्षकाची (Custodian) नेमणूक करणे तसेच प्रस्तुत लिव्हिंग विल हे कायदेशीर दस्तऐवज कायमस्वरुपी जतन करण्यासाठी एक समान डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शहरी भागातील जन्म-मृत्यू निबंधक या नात्याने राज्यातील शहरी भागातील नागरिकांसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरिकांच्या लिव्हिंग विल कायमस्वरुपी जतन करण्यासाठी आयुक्त, सर्व महानगरपालिका, मुख्याधिकारी सर्व नगरपरिषदा/सर्व नगरपंचायती यांची संरक्षक (Custodian) म्हणून याद्वारे नियुक्ती करण्यात येत आहे. सदर लिव्हिंग विलची सुरक्षा आणि जतन हे कस्टोडियनचे कर्तव्य असेल.

राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती येथे शहरी भागातील नागरिकांसाठी त्यांच्या लिव्हिंग विल कायमस्वरुपी जतन करण्यासाठी एकसमान डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून mahaulb portal वर लिव्हिंग विल चे एक module तयार करण्यात आले आहे.

नागरीकांची लिव्हिंग विल कायमस्वरुपी जतन करण्यासाठी तसेच संरक्षक (Custodian) यांना आवश्यकतेनुसार लिव्हिंग विल पाहण्यासाठी व संबंधितांना त्याची प्रत उपलब्ध करुन देण्याकरीता करावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील :

**Online लिव्हिंग विल करण्याची कार्यपध्दती :**

१) अर्जदाराने शासनाच्या mahaulb.in या अधिकृत संकेतस्थळास भेट देणे.
२) संकेतस्थळावरील संबंधित लिव्हिंग विल Window वर अर्ज भरणे. (यामध्ये अर्जदाराची मूलभूत (प्राथमिक) माहिती असेल.)
३) अर्जदाराने त्यांची कायदेशीर रित्या केलेली लिव्हिंग विल Upload करणे.
४) अर्जदाराद्वारे त्यांची लिव्हिंग विल जतन करण्यासंदर्भात संरक्षकाची (Custodian) Online Appointment घेणे.
५) संरक्षक (Custodian) यांनी अर्जदारास सात दिवसांच्या आत प्रत्यक्षात भेटीची वेळ देणे.
६) अर्जदाराने Online पध्दतीने जतन करण्यासाठी upload केलेली लिव्हिंग विल तसेच त्यांची ओळख नक्की करण्यास्तव आवश्यक कागदपत्रांची संरक्षक (Custodian) यांचेकडून नियमानुसार खात्री करणे. आवश्यक त्या सर्व बाबी योग्य असल्यास तद्नंतर अर्जदाराने Online केलेल्या लिव्हिंग विलची प्रत काढून त्या प्रतीवर तसेच अर्जदाराने मागणी केल्यास Online केलेल्या मुळ लिव्हिंग विल च्या प्रतीवर अर्जदारास संरक्षक (Custodian) या सही शिक्क्यासह संरक्षकाद्वारे (Custodian) देणे.

**Offline लिव्हिंग विल करण्याची कार्यपध्दती :**

१) अर्जदाराने शासनाच्या संबंधीत Custodian कार्यालयास भेट देऊन अर्ज सादर करणे.
२) संरक्षक (Custodian) यांनी अर्जदारास सात दिवसांच्या आत प्रत्यक्षात भेटीची वेळ देणे.
३) अर्जदाराने त्यांना करावयाची लिव्हिंग विल अर्जासह नोटरी/Affidavit करुन दोन प्रतीत संरक्षक (Custodian) यांचेकडे सादर करणे. अर्जदाराने संरक्षकाकडे (Custodian) प्रत्यक्षपणे Offline पध्दतीने दाखल केलेल्या लिव्हिंग विल तसेच त्यांची ओळख नक्की करण्यास्तव आवश्यक असलेल्या कागदपत्रांची संरक्षक (Custodian) यांचेकडून नियमानुसार खात्री करणे. आवश्यक त्या सर्व बाबी योग्य असल्यास तद्नंतर अर्जदाराने Offline सादर केलेल्या लिव्हिंग विलची एक प्रत संरक्षकाने (Custodian) mahaulb.in या डिजिटल पोर्टलवरील लिव्हिंग विल module मध्ये Upload करणे. तसेच, अर्जदाराने Offline सादर केलेल्या मूळ notarised लिव्हिंग विलच्या प्रतीवरच संरक्षकाच्या (Custodian) सही शिक्क्यासह संरक्षक (Custodian) यांचेद्वारे ती अर्जदारास देणे.

- **लिव्हिंग विल रद्द करण्याची कार्यपध्दती :**

  लिव्हिंग विल रद्द करावयाची असल्यास अर्जदाराने त्यांच्या लिव्हिंग विल ची मूळ प्रत संरक्षक (Custodian) यांच्याकडे घेऊन जावी. संरक्षकाने (Custodian) त्या मुळ प्रतीवर Cancel च्या सही शिक्क्यासह प्रत अर्जदारास परत करावी व त्याप्रमाणे संरक्षकाने (Custodian) Online Portal वर सुध्दा संबंधितांची लिव्हिंग विल रद्द करावी.

**०२.** सदर लिव्हिंग विल संरक्षित करण्यासाठी प्रशासकीय खर्च म्हणून अर्जदारांकडून रु.१,०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) नोंदणी फी घेण्यात यावी. सदर नोंदणी फी मधील रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) शासनाच्या लेखाशिर्षामध्ये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून जमा करण्यात यावे. या नोंदणी फी मध्ये वेळोवेळी वाढ करण्याचे अधिकार शासनास राहतील.

०३. राज्यातील नागरी भागातील नागरिकांसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरीकांच्या लिव्हिंग विल्स कायमस्वरुपी जतन करण्यासाठी यापूर्वी करण्यात आलेली संरक्षकाची (Custodian) नियुक्ती याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे नागरिकांच्या लिव्हिंग विल्स प्राप्त आहेत, त्या त्यांनी या शासन निर्णयाद्वारे प्राधिकृत केलेल्या संरक्षकाकडे (Custodian) पुढील कार्यवाहीकरिता सुपूर्द कराव्यात व संरक्षकांनी प्रस्तुत शासन निर्णयामध्ये नमुद कार्यपध्दतीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

०५. सदर बाबीची सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून जाहिरात व प्रसिध्दी करण्यात यावी.

०६. सदर लिव्हिंग विलच्या डिजिटल प्लॅटफॉर्मसाठी होणारा खर्च रुपये ६,४९,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख एकोणपन्नास हजार फक्त) तसेच डिजिटल प्लॅटफॉर्म च्या Maintenance करिता वेळोवेळी येणारा खर्च नगर विकास विभाग "मागणी क्र. एफ-३, मुख्य लेखाशीर्ष, २२५१०८१२ (००) (०३) नगर विकास विभाग-ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणी करिता तरतूद (कार्यक्रम) १७, संगणक खर्च या लेखाशिर्षाखाली उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०७१८५९३३८०२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANILKUMAR R UGLE

Digitally signed by ANILKUMAR R UGLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Urban Development Department, 2.5.4.20=1D265DC74C98F72F41F5A1403DB16525E09E7DE2E336C366DE3A32EA2A050A8A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8BBD8635D43D23F28021156F38051619258C51238668F40D15D3209EA39554AA, cn=ANILKUMAR R UGLE
Date: 2026.04.07 19:00:24 +05'30'

**(अनिलकुमार रा. उगले)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उपमुख्यमंत्री (अल्पसंख्यांक, राज्य उत्पादन शुल्क) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) व्यवस्थापकीय संचालक, महा आयटी, महाराष्ट्र राज्य.
८) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन, नवी मुंबई.
९) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).
१०) मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती (सर्व).
११) सरकारी वकील, मा.उच्च न्यायालय, मुंबई.
१२) निवडनस्ती.